# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १७४ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०३ भाद्र. शके १९४८, मंगळवार दि.२५ ऑगस्ट २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## शाळा-कॉलेजच्या वेळेत कोचिंग क्लासेसवर बंदी: काळाची गरज

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

आजचे शिक्षण क्षेत्र एका मोठ्या आव्हानाचा सामना करत आहे. शाळा आणि कॉलेज हे विद्यार्थ्यांच्या मूलभूत विकासाचे केंद्र असायला हवे, परंतु आज तिथे शुकशुकाट आणि कोचिंग क्लासेसमध्ये गर्दी दिसत आहे. अनेक कोचिंग क्लासेस थेट शाळा–कॉलेजच्या वेळेतच चालवले जातात. त्यामुळे शाळा–कॉलेजच्या वेळेत कोचिंग क्लासेसवर बंदी घालणे ही आता केवळ मागणी राहिलेली नसून काळाची गरज बनली आहे.

कोचिंग क्लासेसमुळे विद्यार्थी शाळा–कॉलेज दांडी मारतात, ज्यामुळे शैक्षणिक शिस्त पूर्णपणे कोलमडते. अनेक संस्था डमी ॲडमिशन देऊन विद्यार्थ्यांना फक्त क्लासला जाण्याची मुभा देतात, जे कायद्याने चुकीचे आहे.क्लासेस फक्त परीक्षेतील गुणांवर लक्ष केंद्रित करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचा शारीरिक, सामाजिक आणि नैतिक विकास खुंटतो.शाळा–कॉलेजची फी भरल्यानंतरही कोचिंग क्लासेससाठी लाखो रुपये मोजावे लागल्याने पालकांची मोठी आर्थिक कोंडी होते.अवाढव्य अभ्यासक्रम आणि स्पर्धेमुळे विद्यार्थी २४ तास फक्त अभ्यासाच्या दडपणाखाली राहतात, ज्यामुळे त्यांचे मानसिक आरोग्य बिघडते.

शाळा किंवा महाविद्यालयाच्या वेळेत कोचिंग क्लासेस (खाजगी शिकवण्या) घेण्यास परवानगी नसावी, या विचाराला सध्या शिक्षण क्षेत्रात आणि प्रशासनात खूप महत्त्व दिले जात आहे. विद्यार्थ्यांचे मुख्य शिक्षण हे शाळा–महाविद्यालयांमध्येच झाले पाहिजे, या उद्देशाने हा विचार मांडला जातो.शाळा किंवा महाविद्यालयाच्या वेळेत कोचिंग क्लासेस (ट्यूशन) चालवण्यास परवानगी नसावी, हा विचार विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि मानसिक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे.

अनेक विद्यार्थी फक्त बोर्ड परीक्षा किंवा स्पर्धा परीक्षांच्या (, इ.) तयारीसाठी कोचिंग क्लासेसला प्राधान्य देतात. यामुळे शाळांमधील विद्यार्थ्यांची उपस्थिती कमी होत आहे. ट्युशन क्लासेस मुळे डमी स्कूल्सचा ट्रेंडसुरू आला आहे.केवळ कागदोपत्री प्रवेश दाखवून प्रत्यक्ष वेळ कोचिंग क्लासमध्ये घालवण्याचा प्रकार वाढला आहे. यामुळे शाळेचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

अनेकदा विद्यार्थी कोचिंग क्लासेससाठी शाळा किंवा कॉलेज बुडवतात. क्लासेसवर बंदी घातल्यास विद्यार्थी नियमितपणे वर्गात येतील.

सर्व विद्यार्थी शाळेत उपस्थित राहू लागल्यास, शिक्षकांनाही अधिक चांगल्या पद्धतीने शिकवण्याची प्रेरणा मिळेल. गरीब विद्यार्थ्यांना महागडे कोचिंग क्लासेस परवडत नाहीत. शाळेतच पूर्ण शिक्षण मिळाल्यास सर्वांना समान संधी मिळेल.आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेले विद्यार्थी महागडे क्लासेस लावू शकत नाहीत, ज्यामुळे त्यांच्यावर अन्याय होतो.

शाळा–कॉलेजांमध्ये केवळ परीक्षांचे गुण नव्हे, तर व्यक्तिमत्त्व विकास होतो.शाळा कॉलेजमध्ये सह–शालेय उपक्रम आयोजित केले जातात. खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम आणि प्रयोगशाळेतील प्रात्यक्षिके क्लासेसमध्ये मिळत नाहीत. मित्र बनवणे, समूहात काम करणे ही कौशल्ये कॉलेज कॅम्पसमध्येच शिकता येतात.

मुख्य शिक्षण संस्थेला प्राधान्य मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची योग्य शिस्त निर्माण होईल.एकाच वेळी शाळा आणि क्लासेस सांभाळताना विद्यार्थ्यांची धावपळ होते. वेळेचे नियोजन केल्यास त्यांना विश्रांतीसाठी वेळ मिळेल.दिवसभर फक्त अभ्यासात गुंतून न राहता विद्यार्थ्यांना खेळासाठी आणि इतर छंदांसाठी वेळ मिळेल.सततच्या अभ्यासाच्या दबावामुळे मानसिक आरोग्याच्या समस्या निर्माण होतात.

क्लासेसमुळे शिक्षण क्षेत्राचे व्यापारीकरण झाले असून मुख्य शिक्षण व्यवस्था कमकुवत होत आहे.खाजगी कोचिंग क्लासेसमुळे शिक्षणाचे व्यापारीकरण झाले असून औपचारिक शाळा आणि महाविद्यालयीन शिक्षण व्यवस्था मागे पडत आहे.

क्लासेस हजारो ते लाखांपर्यंत फी आकारतात. यामुळे सामान्य विद्यार्थ्यांचे शिक्षण महाग होत आहे.नफा कमावण्याचा हेतू: शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात आता व्यवसाय आणि नफा मिळवण्याला प्राधान्य दिले जात आहे.रँक आणि गुणांच्या खोट्या किंवा मोठ्या जाहिराती करून पालकांची दिशाभूल केली जाते.

खाजगी शिकवणुकीमुळे मुख्य शिक्षण व्यवस्थेवर परिणाम झाला असून शाळांचे महत्त्व घटले आहे. विद्यार्थी नियमित शाळेत न जाता थेट क्लासेसमध्ये जाणे पसंत करतात.शाळा आता ज्ञानार्जनाचे केंद्र न राहता केवळ परीक्षांचे फॉर्म भरणारी आणि दाखले देणारी कार्यालये बनली आहेत. शाळांमधील शिक्षकांपेक्षा क्लासेसमधील शिक्षकांना विद्यार्थी व पालक जास्त मानतात.यामुळे आपली मुख्य शिक्षण व्यवस्था (शाळा–कॉलेज) कमकुवत होत आहे, या विचाराशी अनेक शिक्षणतज्ज्ञ सहमत आहेत.

कोचिंग क्लासेसच्या मनमानी कारभारावर आणि फीवर शासनाचे कडक नियंत्रण असायला हवे.परीक्षा पद्धतीमध्ये बदल करायला पाहिजे. केवळ गुणांवर आधारित प्रवेश देण्याऐवजी विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण कामगिरीचे मूल्यमापन केले पाहिजे.भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, शाळा किंवा कॉलेजच्या वेळेत कोणत्याही कोचिंग क्लासला परवानगी दिली जाऊ शकत नाही.विद्यार्थ्यांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य जपण्यासाठी क्लासेसच्या वेळा शाळा सुटल्यानंतर किंवा सुट्टीच्या दिवशी असणे बंधनकारक आहे.राज्यं सरकारनी देखील कडक नियम करायला पाहिजे.

शाळा–कॉलेजच्या वेळेत क्लासेसवर कायदेशीर बंदी आणणे अत्यंत आवश्यक आहे. सरकारने यावर कडक नियमावली करून त्याची अंमलबजावणी करावी. त्याच वेळी, शाळा आणि कॉलेजमधील शिक्षणाचा दर्जा सुधारणेही तितकेच गरजेचे आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांना बाहेरील क्लासेसची गरजच भासणार नाही.

# प्रा.यास्मिन शेख यांना.... आठवणीतील पत्र

**ज्योतिर्मय साहित्य**

माननीय प्रा.यास्मिन शेख यांना भाषाअभ्यास डॉ. नागेश अंकुश यांनी लिहिलेले पुस्तक प्रकाशानानंतरचे पत्र.

दि.२८.३.२०२६

आदरणीय प्रा. यास्मिन शेख

सप्रेम नमस्कार,

मला, आपल्याला, आणि डॉ. रसाळ सरांना आणि डॉ.श्रीरंग देशपांडे सरांना (आमच्या संस्थेचे सरचिटणीस) ज्याची खूप आतुरता होती, ते 'मागोवा प्रमाण मराठी भाषेच्या प्रमाणलेखनाचा इतिहास' हे पुस्तक काल प्रत्यक्ष हातात आले आणि तो क्षण अवर्णनीय असा आनंद देऊन गेला. परिश्रमाच्या सार्थकतेचा अनुभव देणारा ... राजहंसचे आदरणीय श्री. दिलीप माजगावकर यांनी स्वतः पुण्याहून पुस्तकाच्या प्रती आणल्यात आणि सोबत पेढे आणले होते. एक प्रथितयश प्रकाशन संस्था – राजहंसचे एक ज्येष्ठ मान्यवर वाचकाचा सन्मान करण्यासाठी प्रत्यक्ष येतात.जपलेली एक सुंदर परंपरा ! खरोखर हा आनंददायी, सुखद असा धक्काच ! अकल्पित, खूप आनंद देऊन जाणारा ...



पुस्तक पाहताच मन भरून आले. ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ, आदरणीय माजगावकर सर, सुप्रसिद्ध चित्रकार श्री. गायतोंडे, तसेच सुमती रसाळ यांच्या स्नेहपूर्ण,प्रेरक उपस्थितीत रसाळ सरांच्या निवासस्थानी अतिशय साध्या ; पण मनस्वी–आत्मीय अशा वातावरणात पुस्तकाचे अनौपचारिक प्रकाशन झाले ,पुस्तक खूपच सुबक , देखणे झाले. हा क्षण माझ्यासाठी आयुष्यातील एक अविस्मरणीय ठेवा ठरतो . यावेळी सर्वांनी आपली आठवण काढली. आपली प्रस्तावना सर्वांना अतिशय आवडली .

२०१८ पासून सुरू केलेला या विषयावरील अभ्यास–प्रवास,आदरणीय डॉ.रसाळ सरांच्या मार्गदर्शनाखाली आणि विशेषतः आपले मौलिक सहकार्य, सूक्ष्म निरीक्षणे, नेमक्या सूचना आणि सातत्यपूर्ण प्रेरणेच्या बळावर आज फलद्रूप झाला. आपण दिलेला वेळ, बारकाईने केलेले परीक्षण, प्रत्यक्ष भेटीत केलेले सखोल मार्गदर्शन, हे सर्व या पुस्तकाच्या निर्मितीत मोलाचे ठरते.

माझं खरंच भाग्य आहे की आपल्यासारख्या अभ्यासू, तत्त्वनिष्ठ आणि संवेदनशील व्यक्तिमत्त्वाचे सान्निध्य लाभले.मोठ्या प्रकाशन संस्थेची पुस्तकावर मोहोर उमटली. आपण लिहिलेली अभ्यासपूर्ण प्रस्तावना पुस्तकाचे बलस्थान ठरली. हा मोठा सन्मान आहे.मानबिंदू आहे, ही भावना मी अत्यंत आदराने व्यक्त करतो.

आपला व्यासंग, भाषेवरील दृढ प्रेम, चिंतनाची खोली, स्मरणशक्तीची तल्लखता, लेखकांविषयी असलेली गुणग्राहकता, मनापासून कौतुक करण्याची उदारता / वृत्ती, आणि कामातली सचोटी हे सर्व गुण आजच्या काळात दुर्मीळच. विशेष म्हणजे, इतरांना उभारी देण्याची, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्याची आपली उदार वृत्ती ही प्रेरणादायी ठरते .




आपल्यासारख्या वडीलधाऱ्या आणि निष्ठावान व्यक्तीकडून मिळालेल्या शुभेच्छा माझ्यासाठी सदैव आशीर्वादरुपी आहेत,असं मी मनापासून मानतो.

आपल्याला प्रत्यक्ष भेटण्याचा योग आला, तेव्हा माझ्यासोबत पत्नी अर्चना आणि मुलगा विनयही होता. दोघेही आपली नेहमी प्रेमळ आठवण काढतात. शमाताई आणि रूमाताई यांची आत्मीयता, अगत्यशीलता आणि तत्पर सहकार्य,हे सर्व अनुभव अत्यंत हृदयस्पर्शीच असेच ... आपले संस्कार त्यांच्यात प्रकर्षाने जाणवतात .

माझ्या प्रकृतीच्या अडचणी, विशेषतः मणक्याच्या तीव्र वेदनेचा त्रास असतानाही आपण आणि रसाळ सरांनी दिलेल्या प्रेरणेने आणि प्रोत्साहनाने आणि राजहंस प्रकाशनाच्या सकारात्मक प्रतिसादाने खरोखर उभारी मिळत गेली. एका अर्थाने हे काम कठीण आणि अशक्यप्राय असे होते.

आपल्याला उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि सतत आनंदी, समाधानकारक आयुष्य लाभावे, अशी ईश्वरचरणी मनःपूर्वक प्रार्थना करतो. आपल्या मार्गदर्शनाचा लाभ पुढेही सतत मिळत राहो, हीच विनम्र अपेक्षा.

**आपला**
**नागेश अंकुश**

***

# अरे संसार संसार...जसा तवा चुल्ह्यावर....

**ज्योतिर्मय साहित्य**

अरे संसार संसार जसा तवा चुल्ह्यावर
आधी हाताला चटके तव्हा मियते भाकर.....



स्व बहिणाबाई चौधरी यांची ही कविता आणि त्यावर झालेले गाणे आजही तितकीच लोकप्रिय आहे. स्व. बहिणाबाईं चौधरी यांचा जन्मदिवस म्हणजे २४ ऑगस्ट होय. मराठी साहित्याच्या समृध्दी मध्ये मोठा वाटा असणाऱ्या आणि आपल्या साध्या, सरळ आणि मनाला भिडणाऱ्या कवितांनी अजरामर झालेल्या लोकप्रिय कवयित्री म्हणजे या बहिणाबाई चौधरी.

त्यांना औपचारिक शिक्षण नसतानाही त्यांना निसर्गदत्त काव्यप्रतिभा लाभली होती.

घरातील व शेतातील कामे करताना त्यांच्या मनात कविता स्फुरत आणि त्या त्या ओव्या सहजपणे गात असत. त्यांच्या कविता पुढे त्यांच्या पुत्राने आणि नातेवाइकांनी लिहून जतन केल्या.




बहिणाबाईंचा जन्म २४ ऑगस्ट १८८० मध्ये जळगाव जिल्ह्यातील आसोदे येथे झाला. त्यांचे जीवन ग्रामीण आणि कष्टमय होते. त्यामुळे त्यांच्या कवितेत शेती, माती, पाऊस, पिके, संसार, नाती, सण–उत्सव आणि सामान्य माणसाचे सुख–दुःख यांचे अत्यंत जिवंत चित्रण आढळते.

बहिणाबाईंच्या कवितेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची खानदेशी व लेवा गणबोली. त्यांनी अवघड साहित्यिक भाषा न वापरता आपल्या मातृबोलीतील साधे शब्द वापरले. त्यामुळे त्यांच्या कविता थेट सामान्य माणसाच्या मनाला भिडतात. त्यांच्या साध्या शब्दांत जीवनाचे गहन तत्त्वज्ञान दडलेले आहे. त्यांच्या प्रसिद्ध कवितांमध्ये 'मन वढाय वढाय', 'अरे संसार संसार', 'अरे खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला', 'आला पह्यला पाऊस', 'आला आला शेतकऱ्या' अशा अनेक रचनांचा समावेश होतो.

'अरे संसार संसार' या कवितेत संसारातील कष्टांचे वास्तव त्यांनी अत्यंत प्रभावीपणे मांडले आहे

या ओळींतून संसारात सुख मिळवण्यासाठी कष्ट आणि त्याग करावा लागतो, हा साधा पण अतिशय मोठा जीवनसंदेश मिळतो.

'मन वढाय वढाय' या कवितेत त्यांनी मानवी मनाची चंचलता सुंदर पद्धतीने व्यक्त केली आहे. मन एका ठिकाणी स्थिर राहत नाही; ते सतत इकडे–तिकडे धावत असते, हा अनुभव त्यांनी ग्रामीण जीवनातील उदाहरणांतून मांडला आहे.


बहिणाबाईंच्या कवितेत निसर्ग आणि शेती यांना विशेष महत्त्व आहे. शेतकरी, जमीन, पाऊस, पिके, झाडे, पक्षी आणि प्राणी हे त्यांच्या कवितेचे जिव्हाळ्याचे विषय आहेत. त्यांच्या स्वतःच्या जीवनानुभवामुळे त्यांच्या कविता कृत्रिम न वाटता अत्यंत अस्सल वाटतात. त्यांच्या कवितेत मानवी जीवनाचे तत्त्वज्ञानही दिसते. ''मानसा मानसा, कधी व्हशील मानूस'' हा त्यांचा प्रश्न आजही तितकाच अर्थपूर्ण आहेआणि अजूनही अनुत्तरित ही आहे.

माणसाने केवळ जन्माने माणूस न राहता आपल्या वागण्यातून माणुसकी जपावी, असा संदेश या विचारातून मिळतो . अश्या या श्रेष्ठ कवयित्रीचे निधन ३ डिसेंबर १९५१ रोजी झाले.

बहिणाबाईंच्या कवितांचा संग्रह त्यांच्या निधनानंतर 'बहिणाबाईंची गाणी' या नावाने १९५२ मध्ये प्रसिद्ध झाला. या संग्रहाच्या प्रकाशनासाठी आचार्य अत्रे यांनी पुढाकार घेतला होता. संग्रहात ३५ कविता आहेत.

बहिणाबाईंचे साहित्य हे केवळ कविता नसून ग्रामीण जीवनाचा अनुभव, स्त्रीमनातील भावना, कष्टकरी माणसाचे जगणे आणि जीवनाकडे पाहण्याचे शहाणपण आहे. त्यांच्या कविता आजही तितक्याच लोकप्रिय आहेत कारण त्या साध्या भाषेत मोठे सत्य सांगतात.

बहिणाबाई चौधरी या मराठी साहित्याला लाभलेल्या अस्सल लोककवयित्री होत्या. त्यांच्या कवितांमध्ये खानदेशच्या मातीचा सुगंध, शेतकऱ्याच्या कष्टांची जाणीव, स्त्रीमनातील भावना आणि जीवनाचे गहिरे तत्त्वज्ञान आहे, ते ही सहज आणि साधेपणाने व्यक्त झालं आहे. शिक्षण नसतानाही त्यांनी आपल्या प्रतिभेच्या जोरावर मराठी साहित्यामध्ये अढळ स्थान निर्माण केले. म्हणूनच बहिणाबाईंचे साहित्य आजही प्रत्येक पिढीला जगण्याची नवी दृष्टी आणि माणुसकीचा संदेश देते,आणि सदैव देत राहील यात काहीच शंका नाही. माझ्या एका स्वलिखित चारोळीने या लेखाचा शेवट करतो अरे मानसा मानसा कधी होशील मानुस? प्रश्न अनुत्तरित आहे कधी येईल तो दिस? स्व.बहिणाबाई चौधरी यांना त्यांच्या जयंतीनिमित्त विनम्र आदरांजली.








## जात्यावरच्या ओव्या......

मायबापान टाकलं
तरी वाढला वडावाणी
नाही मोडला काटा
पाय चालला अनवाणी ||८११||

मायबापान टाकलं
सांभाळतो ढगातला
नका म्हणू वनवासी
नही आवडत त्याला ||८१२||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ६४




ज्योतिर्मय साहित्य

हेमधामी आणि विरामी ही दोन विशेषणे समर्थांनी फार सुंदर योजली आहेत. हेमधामी म्हणजे सोन्याचं घर, राजवाडा. विरामी म्हणजे रामाशिवाय. हल्ली काही घरांमध्ये हे घर श्री महाराजांचे आहे अशी पाटी लावलेली आढळते. म्हणजे राहणाऱ्यांची अशी श्रद्धा असते की या घरात महाराज किंवा भगवंत राहतो. हे त्याच्याच मालकीचे आहे. म्हणजे भगवंताच्या छत्रछायेत आपण राहत असतो. आणि इथे भगवंत आहे ही भावनाच किती सुंदर ! असे घर म्हणजे मंदिरच ! हीच कल्पना थोडी आणखी विस्तारली तर आपला देह म्हणजे सुद्धा भगवंताचे निवासस्थान असेही आपल्याला म्हणता येते. त्याच्या श्रद्धेविना असलेला देह म्हणजे फक्त हाडामांसाचे शरीर !



घर सोन्याचे असले तरी घरात राहणाऱ्यांची जर भगवंतावर श्रद्धा नसेल, तर असे घर म्हणजे चार भिंतींचा एक तुरुंग !सोन्याचे घर म्हणजे राजवाडा, वैभव ! पण जिथे राम नाही त्या घराची किंमत शून्य. ज्या दगडांवर रामनाम लिहिले जाते, ते दगड सुद्धा तरतात. रामावर म्हणजे भगवंतावर श्रद्धा नसलेली व्यक्ती म्हणजे मूढ पाषाणच ! या संसार सागरात ती बुडणारच हे ठरलेले आहे !महाभारत युद्धाच्या प्रसंगी अर्जुन आणि दुर्योधन श्रीकृष्णाकडे मदत मागण्यासाठी जातात. भगवंत म्हणतात, ‘‘ एका बाजूला निःशस्त्र असलेला मी आहे आणि दुसऱ्या बाजूला माझी नारायणी सेना. त्यातून ज्याला जे हवे ते त्याने मागून घ्यावे. ‘‘ या प्रसंगी दुर्योधन नारायणी सेना मागून घेतो आणि अर्जुन भगवंताला. ही कथा आपल्या सगळ्यांना माहिती आहे. पण अर्जुनाची भगवंतावर दृढ श्रद्धा होती. म्हणून मला भगवंतच हवा असे त्याला ज्या तीव्रतेने वाटले तसे दुर्योधनास वाटणे शक्यच नव्हते. नारायणाशिवाय नारायणी सेना काय कामाची ? म्हणून अर्जुनाला जसे तीव्रतेने वाटले की मला भगवंतच हवा तसे आपल्यालाही वाटले पाहिजे. तेव्हा हे मना, आदरपूर्वक रामरायावर प्रेम करायला शीक हेच समर्थांचे सांगणे आहे.

स्वसंवाद : १) माझ्या जीवनात श्रद्धेचा आधार किती आहे ? संकटाच्या वेळी मी खचतो की स्थिर राहतो ?

२) मी ‘नारायणी सेना’ (संपत्ती, साधने) निवडतो की ‘नारायणाची निवड करतो ?

३) माझे घर ‘हेमधामी’ आहे की ‘रामधामी’ ?

४) माझ्या आनंदाचा स्रोत बाह्य गोष्टींमध्ये आहे की अंतर्मनातील भक्तीत ? (क्रमशः)




ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏

## ॥ संजय उवाच... ॥


@संजय काव्या पुणे 7743918559



✍️ अभ्यास
अभ्यासाने कायम
फायदाच होतो त्यामुळे
प्रत्येक गोष्ट करण्यापूर्वी
त्याचा अभ्यास करणे
जरुरी असते, असे जो
करतो तो सर्व क्षेत्रात
नक्कीच यशस्वी होतो.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

## रिकामा वेळ सगळा भगवंताकडे लावावा



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

साधारणपणे ज्या वस्तू देहाला सुख देतात त्या पुष्कळ मिळवणे हे आपल्या जन्माचे ध्येय आहे असे आपल्याला वाटते. परंतु अशा वस्तू ज्यांच्यापाशी पुष्कळ आहेत ती माणसे सुखी झालेली आढळत नाहीत. किंबहुना, अशा वस्तू जितक्या जास्त जमा कराव्या तितकी आपली हाव वाढतच जाते. पुढे वय झाल्यावर देह क्षीण होतो आणि त्याचे भोगण्याचे सामर्थ्य कमी होते. मग वस्तू असून देखील मनाची तळमळ कायम राहते. म्हणून शहाण्या माणसाने आत्तापासूनच आपले सुख बाहेरच्या वस्तूवर अवलंबून न ठेवण्याचा अभ्यास करावा. बाहेरची वस्तू सुटली तरी मनाला दुसरी वस्तू देणे अवश्य असते. अशी वस्तू म्हणजे भगवंत होय. भगवंत हा नेहमी राहणारा, स्वयंपूर्ण आणि आनंदमय असल्यामुळे त्याचे चिंतन करता करता मनामध्ये ते गुण उतरतात. अर्थात, मन भगवंताच्या चिंतनाने आनंदमय बनल्यावर त्या माणसाचे जीवन किती रसमय होत असेल याची कल्पना करावी.

आपल्यासारख्या व्यवहारी प्रापंचिक माणसांना चिंतन करण्यात एकच अडचण येते. ती म्हणजे व्यवहार आणि साधन यांची जोड घालणे. आपली अशी कल्पना असते की, भगवंताचे चिंतन करणारा माणूस व्यवहार बरोबर करू शकत नाही. तुकारामबुवांसारख्या परमात्मचिंतनात बेभान झालेल्या पुरुषांची गोष्ट निराळी. आपल्यासारख्या माणसांना आपला व्यवहार अत्यंत बरोबर केल्यानंतर जो वेळ उरेल तितका भगवंताकडे लावला तर आपण फारच प्रगती केली असे म्हणता येईल. खरे पाहिले असता सध्या जेवढा रिकामा वेळ आपल्याला मिळतो तितका सगळा आपण भगवंताकडे लावत नाही. म्हणून दिवसातून काही वेळ तरी अत्यंत नियमाने भगवंताच्या नामस्मरणात घालवायचा आपण निश्चय करावा. नामाच्या आड सर्वच गोष्टी येतात, आपण स्वत:देखील त्याच्या आड येतो, तेवढे सांभाळावे आणि जगाच्या नादी फारसे न लागता आपले नाम चालू ठेवावे. शिवाय, देवासंबंधीची फक्त संतांनी लिहिलेली पुस्तके रोज थोडी वाचावी, त्यावर मनन करावे, आणि ते आपल्या आचरणात कसे येईल याचा सूक्ष्म विचार करावा. अशा मार्गाने जो जाईल त्याची हां हां म्हणता प्रगती होईल आणि त्याला समाधान मिळेल.

समाधान हीच खऱ्या आनंदाची खूण आहे.

## ॥ अध्यात्म ॥

मधुकर बोरीकर,
पुणे

### ♦श्री लक्ष्मी व नरसिंह मंदिर निरा नरसिंगपूर

नीरा नरसिंगपूर हे पुणे जिल्ह्यातील, इंदापूर तालुक्यातील, एक प्रसिद्ध आणि ऐतिहासिक तीर्थक्षेत्र आहे. हे तीर्थस्थान पुण्यापासून 155 किलोमीटर अंतरावर आहे. हे ठिकाण भीमा आणि नीरा या नद्यांचा संगमावर, हे तीर्थक्षेत्र वसले आहे.

♦दक्षिण प्रयाग

नीरा आणि भीमा या पवित्र नद्यांच्या सोबतीस लक्ष्मी मंदिरातून स्त्रवणारी सरस्वती नदी (हिलाच गुप्त गंगा असेही म्हणतात) तीही या संगमात मिळते. लक्ष्मी मंदिरातून उगम पावलेली ही नदी पुढे गुप्त होते. त्यामुळे हिला गुप्त गंगा ही म्हटल्या जाते.


उत्तर प्रदेशातील प्रयागराज या तीर्थाप्रमाणे इथेही तीन नद्यांचा संगम असल्याने याला दक्षिण प्रयाग म्हणतात.

♦भु नाभी स्थान

हे स्थान पृथ्वीच्या मध्यभागी असल्याने ते पृथ्वीचे नाभी स्थान मानल्या जाते.

♦श्री लक्ष्मी व नरसिंह मंदिर

नीरा नरसिंगपूर येथील ही दोन महत्त्वाची मंदिरे आहेत. भगवान नर सिंहाच्या मंदिराच्या जवळच माता लक्ष्मीचे ही वेगळे मंदिर आहे. (क्रमश:)




### "पालकःमुले व शिकणे"

मित्रांनो, आजचा आपला विचार आहे; जो ज्वलंत आणि सर्वाच्या कौटुंबिक चर्चेचा प्रश्न आहे, तो म्हणजे मुले व त्यांचे संगोपनपालन व संस्कार! आपल्या पाल्यांच्या विकासासाठी काय, कसे करावे? हम दो हमारे दो, विभक्त कुटुंब दोघे बाहेर ड्यूटीवर, आणि मुले दुसर्याच्या भरोस्यावर? मग त्यांचे संस्कार, प्रेमळ वातावरण, संवाद, स्वातंत्र्य, संस्कार, आणि योग्य मार्ग- दर्शन कमी झाले काय?काय कारणे? करावे कसे? पालकत्व सांभाळावे कसे. असे नाना प्रश्न. महत्वाचे म्हणजे फक्त पैसा साधनाची रेलचेल अवास्तव स्वप्ने अपेक्षा यामुळे प्रश्न सुटतील असे मला वाटत नाही. आपणास काय वाटते मला कंमेट करा.. समाज शाळा विद्यालयातून, बाहेर किंवा वेगवेगळ्या खेळ यातून ते शिकतच असतात पण पालकांनी स्वतःचे वागणे, आचरणाने दक्ष राहावे.. कारण तेच मुलांचे आदर्श असतात. रागावर नियंत्रण, स्वच्छता, सवयी खोटे बोलणे, भांडणाचे विषय न वाढविणे, सर्व चालते ही पृवृत्ती, अती लाड या सर्व गोष्टी, सवयी मुले अनुकरण करतात. म्हणून आईवडील, मोठेभाऊ यांनी चुकीच्या पध्दती, संस्कार याची जाणीव करून देणे स्वप्ने न लादने, छोटी कामे सोपवून सहभागी करणे.. लहान मुले म्हणजे मातीचा गोळा किंवा छोटे रोपटे तुम्ही जसा आकार द्याल, जशी निगा राखाल, नियमित खतपाणी द्याल तसे हे झाड होईल किंवा मडके देखील सुदंर होईल आकार घेईल! आज येथेच थांबतो आपण वाचत राहा सुख दु:खाचे तरंग माणसा-माणसाचे, स्वस्थ रहा मस्त राहा. सुप्रभात.



## शरीरामध्ये कॅन्सर कसा उत्पन्न होतो?

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

२) एनर्जी मिळते...

पालकमध्ये फायबर, आयर्न आणि व्हिटॅमिन्स भरपूर प्रमाणात असतात. ज्यामुळे शरीराला ऊर्जा मिळते आणि याद्वारे शरीराचा थकवा दूर करण्यास मदत मिळते.

३) डोळ्यांसाठी फायदेशीर...

पालक भाजीमध्ये व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन के आणि लूटिनसारखे महत्वाचे न्यूट्रिएंट्स असतात. जे डोळ्यांचं आरोग्य चांगलं ठेवण्यासाठी फायदेशीर असतात.

४) हाडे होतात मजबूत...

पालक भाजीमध्ये व्हिटॅमिन के आणि कॅल्शिअम भरपूर प्रमाणात असतं, ज्यामुळे हाडे मजबूत होण्यास मदत मिळते. हाडांसंबंधी आजारांचा धोकाही कमी होतो.

५) आतड्यांसाठी फायदेशीर...

पालक भाजीमध्ये फायबर भरपूर असतं. जे आतड्यांचं आरोग्य चांगलं ठेवण्यास मदत करतं. सोबतच बद्धकोष्ठतेची समस्याही दूर होते.

६) त्वचेसाठी फायदेशीर...

पालक भाजीमध्ये व्हिटॅमिन्स आणि अँटी-ऑक्सिडेंट्स भरपूर असतात. जे त्वचा चांगली ठेवण्यासाठी फायदेशीर ठरतात. या तत्वांमुळे त्वचा चमकदार दिसते.

७) वजन नियंत्रित राहतं...

पालक भाजीमध्ये कॅलरी कमी असतात. त्यामुळे जे लोक वजन कमी करण्याच्या प्रयत्नात असतात त्यांच्यासाठी ही भाजी फायदेशीर ठरते.

८) हृदयासाठी फायदेशीर...

पालकमध्ये पोटॅशिअम भरपूर प्रमाणात असतं, जे हृदयासाठी फायदेशीर असतं. याने हार्ट अटॅकचा धोकाही कमी होतो.

९) मानसिक आरोग्य चांगलं राहतं...

पालक भाजीमध्ये फोलेट असतं, जे डिप्रेशन आणि स्ट्रेस लेव्हल कमी करण्यास मदत करतं.

१०) डिटॉक्सिफिकेशन..

पालक भाजीमध्ये अँटी-ऑक्सिडेंट असतात, जे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करतात.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

राईच्या तेलाचे फायदे

राईच्या तेलात अँन्टी ऑक्सिडंटस (-) असतात त्यामुळे राईच्या तेलाने रोज अंगाची मसाज केल्यास फंगल इन्फ ेक्शन, त्वचेची आग होणे. तसेच खाज येण्याची समस्या निर्माण होणार नाही.

त्वचा उजळण्यासाठी आवश्यक असे अनेक गुणधर्म मोहरीच्या तेलात असतात. त्यामुळे त्वचेला कोणतेही हानी होत नाही. खोबरेल तेलात मोहरीचे तेल मिसळून चेहऱ्यावर लावल्याने रक्तप्रवाह सुधारतो आणि त्वचा उजळते. राईचे तेल शरीराला लावल्यास स्किनवर मॉइश्चरायजरचे काम करते. त्वचा कोरडी पडण्याची समस्या उद्भवत नाही.

हिवाळ्याच्या दिवसांत टाचांना भेगा पडायची समस्या निर्माण होत असते. तुमच्या सुद्धा टाचांना भेगा पडत असतील तर तुम्ही राईचे तेल भेगांना लावल्यास आराम मिळतो. त्याचबरोबर सांधेदुखी अथवा ओठ फुटल्याची समस्या जाणवत असेल, तर राईच्या तेलाने तुम्हाला यापासून सुटका मिळू शकते

मोहरीच्या तेलातील मोनोअनसॅच्युरेटेड फॅटी ॲसिडमुळे काही आरोग्य फायदे मिळू शकतात.

(क्रमशः)

## प्रभातपुष्प

### षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

श्रावण सोमवार

दुसरा श्रावणी सोमवार
येता सर्व आनंदाने
महादेवाची पूजा करती
वंदन करुन प्रभूस
बेल,श्वेत पुष्पासह
तांदळाची शिवमूठ वाहती

ॐ नमः शिवाय
मुखी जप करत
महादेवास करु वंदन
श्रावणी सोमवारी दरवळे
भक्तीभावाचा खरा सुगंध
शिवलीलेचे ओठी गायन

# श्रावण महिन्याची कहाणी

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

एक मोठ्या मोठ्या उंच इमारतीचं नगर होतं. लोक खूप श्रीमंत होते. आधुनिक घरात रहात होते. आधुनिक तंत्रज्ञान वापरत होते. एका क्लिकवर सगळे पुढ्यात येत होते. भाजीपाला,समान सगळे क्षणात दरात येत होते.

हातात पैसाच पैसा होता. खाण्या पिण्याची चंगळ होती. आलिशान गाड्या होत्या. मुलं उत्तमोत्तम शाळेत जात होती. प्रत्येक हातात मोबाईल होता. टेबलवर संगणक होता. जग जवळ आलेले होते. नेटने जाळ्यात पकडलेले होते. सगळीकडे सुबत्ता होती. पण ... कुठेतरी उणीव होती. आरोग्य मात्र बिघडलेले होते. डॉ. कडे मोठ्या रांगा होत्या. औषधांची दुकाने जोरात चालत होती. प्रत्येक माणशी काही ना काही आजार होता. मनस्वास्थ्य हरवले होते.

काय करावे कळेना. आरोग्य पैशाने विकत घेता येईना. सगळे होते चिंतेत. आपापल्या व्यथेत. तेवढ्यात एक माणूस आला. जणू देवदूतच भासला. खूप अनुभव त्याच्या गाठीला. एका मोठ्या कार्यक्रमात दाखल झाला. आनंदी राहण्याचा उपाय सांगतो म्हणाला. फक्त एक अट आहे म्हणाला. सगळे आवाज बंद करा. सर्वांनी जमिनीवर आसन धरा. लोकांनी तसेच केले. कारण सगळे होते शांतीचे आणि आनंदाचे भुकेले.



देवदूत म्हणाला खरेच मन:शांती व आनंद हवा असेल,तर माझे ऐकावे लागेल. एक व्रत करावे लागेल. सगळ्यांनी होकार भरला. प्रत्येक जण कान टवकारून ऐकू लागला. देवदूत बोलू लागला. चांगल्या गोष्टीची सुरुवात करायला श्रावण महिना आहे चांगला. फरक पडला तर कायम हे व्रत करा. आता फक्त सुरुवात करा.




या व्रतात काय करावे? सांगतो ऐका लक्ष द्यावे. आठवड्यात एक दिवस हे व्रत करावे. सकाळी लवकर उठावे. प्रथम मोबाईल, इंटरनेट बंद करावे. मोकळ्या हवेत फिरून यावे. फिरता फिरता स्वसंवाद करावे. उत्साहात घरी यावे. आई वडील यांच्या जवळ बसावे. छान छान बोलावे. सर्वांनी एकत्र चहा,नाश्ता घ्यावा. घरात मुलांशी खेळावे. गप्पा गोष्टी कराव्यात. थोडे स्वयंपाक घरात डोकवावे मदती साठी विचारावे. जमेल ते काम करावे. दुपारी निवांत वेळी जुने कपाट आवरायला घ्यावे. त्यातील जुने फोटोंचे अल्बम बघावे. आठवणींना जागवावे. कपाट आवरताना मनही आवरावे. वाटले तर दुपारी आळसावून झोपावे. नाहीतर आवडते संगीत ऐकावे. एक दिवस स्क्रीनचा उपास करावा. आरोग्याचा मार्ग धरावा. आनंदाचा रस्ता शोधावा. रात्री सर्वांनी हसत खेळत, गप्पा मारत सहभोजन करावे. सर्वांनी एक दिवस हॉल मध्ये गाद्या घालून झोपावे. असे व्रत करावे. फायदे अनुभवावे. चांगल्या आरोग्यदायी परिणाम मिळण्या साठी आठवड्यातून एकदा हे व्रत करावे. पुढच्या वेळी येईन तेव्हा अनुभव सांगावे. एवढे सांगून देवदूत निघून गेला. व्रत आचरणात आणण्याचा प्रत्येकाने निश्चय केला. आपणही असे आचरण करावे. हे आपल्या चार्जिंगचे साधन समजावे. एक दिवस सुट्टी मिळाली म्हणून इकडे तिकडे जाऊन टेन्शन घेण्या पेक्षा हे उपाय करून बघावे. आपणच आपला आनंद शोधावा. व्रत कसे वाटले सांगावे. आवडले न आवडले जरुर सांगावे. आवडल्यास कृपया नावासहित पुढे पाठवावे.




# मिर्झापूरची धमाकेदार एन्ट्री पुण्यात! 'मिर्झापूर: द मूव्ही'च्या प्रमोशनसाठी टीमची पुणेकरांशी खास भेट

## पुण्यात रंगणार मिर्झापूरचा माहोल! 'मिर्झापूर: द मूव्ही'ची टीम येणार चाहत्यांच्या भेटीला

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

पुणेकरांनो, सज्ज व्हा ! बहुप्रतिक्षित आणि प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण करणाऱ्या 'मिर्झापूर: द मूव्ही' च्या प्रमोशनसाठी चित्रपटाची टीम या बुधवारी पुणे शहरात दाखल होणार आहे. लोकप्रिय 'मिर्झापूर'च्या जगाला आता पहिल्यांदाच मोठ्या पडद्यावर अनुभवण्याची संधी प्रेक्षकांना मिळणार असल्याने, चित्रपटाच्या प्रदर्शनापूर्वीच चाहत्यांमध्ये जबरदस्त उत्साह पाहायला मिळत आहे.

ओटीटीवर आपल्या दमदार कथा, रंजक व्यक्तिरेखा, थरारक घडामोडी आणि संवादांमुळे 'मिर्झापूर'ने प्रेक्षकांच्या मनात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. आता याच लोकप्रिय विश्वाची कथा आणखी मोठ्या आणि भव्य स्वरूपात 'मिर्झापूर: द मूव्ही'मधून प्रेक्षकांसमोर येण्यासाठी सज्ज झाली आहे. चित्रपटाच्या प्रमोशनसाठी पुण्यात होणाऱ्या या खास भेटीत टीम चाहत्यांशी संवाद साधत चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणखी वाढवणार आहे.

'मिर्झापूर'च्या चाहत्यांसाठी ही भेट विशेष ठरणार असून, चित्रपटाची टीम पुण्यात येणार असल्याने शहरातील चाहत्यांमध्येही मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. मोठ्या पडद्यावर 'मिर्झापूर'चा अनुभव कसा असणार, याची चर्चा सध्या सर्वत्र रंगली आहे. त्यामुळे या प्रमोशनल दौऱ्याकडे चाहत्यांचे आणि मनोरंजनप्रेमींचे लक्ष लागले आहे.

ॲमेझॉन स्टुडिओज आणि एक्सेल एंटरटेनमेंट प्रस्तुत 'मिर्झापूर: द मूव्ही'चे दिग्दर्शन गुरमीत सिंह यांनी केले आहे, तर चित्रपटाची कथा आणि लेखन पुनीत कृष्णा यांनी केले आहे. एक्सेल एंटरटेनमेंटच्या बॅनरखाली रितेश सिधवानी आणि फरहान अख्तर यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. कासिम जगमगिया आणि विशाल रामचंदानी हे चित्रपटाचे सह-निर्माते आहेत.

पुण्यातील या खास प्रमोशनल भेटीनंतर 'मिर्झापूर: द मूव्ही' बद्दलचा माहोल आणखी रंगणार आहे. 'मिर्झापूर: द मूव्ही' ४ सप्टेंबर २०२६ रोजी सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

# कै.राजीव आयाचित यांचे स्मरणार्थ रक्तदान शिबिर संपन्न

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

पुणे - राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, शनिवार वाडा साप्ताहिक मिलनाचे कार्यवाह कै.राजीव अयाचित यांच्या स्मरणार्थ दिनांक २३ ऑगस्ट रोजी भारतीय संस्कृती संवर्धक संस्था आणि शनिवार वाडा साप्ताहिक मिलन यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते.कै.राजीव अयाचित यांचे मागील महिन्यात दुःखद निधन झाले होते.अत्यंत सुस्वभावी आणि कसबा पेठ भागात आपल्या मनमिळाऊ स्वभावाने,दांडग्या संपर्का मुळे ते सर्वांनाच परीचित होते.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ते एक समर्पित कार्यकर्ते होते.



कसबा भाग कार्यवाह राहुलजी पुंडे आणि राहुल अयाचित यांनी भारतमातेच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. ''याज्ञवल्क्य आश्रम'' येथे संपन्न पडला. रक्तदान शिबिरात पंचवीस रक्तदात्यानी रक्तदान करून राजीवजींना श्रध्दांजली वाहिली.कार्यक्रम यशस्वितेसाठी सुनिल तांबट,दुर्गेश निजामपुरकर,अजय सातपुते,महेश काळे,भरत हजारे,अनिल बलकवडे,श्रीहर्ष सगरे,आशुतोष लिमये, ओंकार लंके,संदिप सुराणा,विलास क्षीरसागर,सचिन पुरोहित यांनी योगदान दिले.जनकल्याण रक्तपेढीच्या डॉक्टर वैशाली जठार व त्याचा कर्मचारीवर्ग यांच्या सहकार्यातून हा कार्यक्रम यशस्वी पणे पार पडला.

# श्री कोटेश्वर देव विश्वस्त तर्फे गोवे गावातील महिलांसाठी मोफत आरोग्य शिबिर संपन्न

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**


पुणे - श्री कोटेश्वर देव विश्वस्त संस्थांतर्फे सातारा जिल्ह्यातील गोवे गावातील महिलांसाठी नुकतेच मोफत आरोग्य शिबीर घेण्यात आले.त्यात प्रामुख्याने हिमोग्लोबिन तपासण्यात आले.एकूण ७६ ग्रामीण महिलांनी या शिबिराचा लाभ घेतला.यात १३ महिलांचे हिमोग्लोबिन कमी आढळल्याने त्यांना पुढील दीड महिन्यासाठीच्या गोळ्या व औषधे मोफत देण्यात आले.त्यांना पुढील निरोगी आयुष्यासाठी वैद्यकीय मार्गदर्शन करण्यात आले तसेच,''डाएट प्लान'' देण्यात आला. या गावातील दहावी बारावी मधील या वर्षी झालेल्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थांचा श्री कोटेश्वर देव संस्थान तर्फे सत्कार करण्यात आला. विविध इयत्ते मधील एकूण नव्वद गरीब उत्तीर्ण विद्यार्थांना व विद्यार्थिनींना सेवा सहयोग च्या सहकार्याने श्री कोटेश्वर देव संस्थान तर्फे मोफत स्कूल किट्स व शैक्षणिक साहित्य देण्यात आले.




या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन संस्थान चे अध्यक्ष गिरीश चितळे, उपाध्यक्ष विष्णू आपटे, चिटणीस परशुराम दाते, कोषाध्यक्ष चेतन गाडगीळ, योगेश अभ्यंकर, योगेश गाडगीळ, प्रदीप कुंटे, रवींद्र गाडगीळ, वसंत साठे तसेच जनकल्याण रक्तपेढीचे डॉ अतुल कुलकर्णी, आरोग्य भारतीचे डॉ राजश्री नाईक, डॉ जितेंद्र देशपांडे, डॉ शुभदा पालकर सेवा भारती सातारा शाखेचे कार्यकर्ते हेमंत देशपांडे, शरद भरमगुंडे, धनंजय कापरे यांनी केले.









## काव्यशास्त्र : कविता लिहिण्यापूर्वी अंतिम भाग - ८

शांडिल्यगोत्रोत्पन्नभालेरावमुकुन्दोऽहम्
छत्रपतीसम्भाजीनगरम्
विद्युतसन्देशसूत्रम्-bhalerao.mukund@gmail.com
भ्रमणभाषक्रमान्क: ८३०८८३५३१३



### कवितेचे पुनर्लेखन, संपादन आणि कवीची अखंड साधना

पुढे....

♦ टीका स्वीकारण्याची तयारी

कविता प्रकाशित झाल्यानंतर सर्वांनाच ती आवडेल, असे कधीच होत नाही. काही जण स्तुती करतील, काही दोष दाखवतील. प्रशंसेमुळे आनंद व्हावा; परंतु अहंकार वाढू नये. टीकेमुळे निराश न होता, तिच्यातील सत्य स्वीकारण्याची वृत्ती ठेवावी. अनेकदा प्रामाणिक टीका हीच कवीची खरी गुरू ठरते.

♦ कवीची खरी साधना

कविता लिहिणे ही घटना आहे; पण कवी होणे ही साधना आहे. ही साधना कशातून घडते?

- सातत्याने वाचन,
- निसर्गाचे सूक्ष्म निरीक्षण,
- समाजजीवनाचा अभ्यास,
- संस्कृत आणि मराठी वाङ्मयाचा परिचय,
- मानवी भावनांचे आकलन,
- नियमित लेखन,
- आणि निरंतर आत्मपरीक्षण.

कवी जितका जीवनाच्या जवळ जातो, तितकी त्याची कविता जीवनस्पर्शी होते, हृदयस्पर्शी होत जाते.

♦ कवीसाठी दहा आचारसूत्रे

या संपूर्ण मालिकेचा सार पुढील दहा सूत्रांत मांडता येईल.

१. भरपूर वाचा; त्याहून अधिक निरीक्षण करा,
२. अनुभवाशिवाय कविता लिहू नका,
३. शब्दांची काटेकोर निवड करा,
४. रसाला नेहमी प्राधान्य द्या,
५. अलंकारांचा संयमित वापर करा,
६. वृत्त, छंद आणि लय यांचा अभ्यास करा,
७. निसर्ग, समाज आणि माणसे यांचे सूक्ष्म निरीक्षण करा,
८. कवितेचे पुनर्लेखन करण्यास कधीही संकोच करू नका,
९. टीका मनापासून स्वीकारा आणि त्यातून शिका,
१०. कविता प्रसिद्ध करण्यापेक्षा उत्तम कविता लिहिण्याचा ध्यास घ्या.

♦ थांबण्यापुर्वी.....

कविता ही स्पर्धेचा विषय नाही; ती आत्मशोधाची प्रक्रिया आहे. प्रत्येक कवीचा आवाज वेगळा असतो. दुसऱ्याचे अनुकरण करून काही काळ यश मिळेल; परंतु दीर्घकाळ टिकणारी ओळख स्वत:ची शैली निर्माण केल्यानेच मिळते.

या आठ लेखांत मी मांडलेले विचार हे माझ्या वाचन, चिंतन आणि अनुभवातून साकार झाले आहेत. ते अंतिम सत्य आहेत, असा दावा नाही. प्रत्येक वाचकाने स्वत:च्या अनुभवाच्या कसोटीवर हे विचार तपासावेत, त्यातून जे उपयुक्त वाटेल ते स्वीकारावे आणि स्वत:ची काव्यवाट स्वत: घडवावी. समारोप संत ज्ञानेश्वर माउलींच्या पसायदान मधील मंगलकामनेने करणे अधिक उचित वाटते.

जो जे वांछील तो ते लाहो । प्राणिजात ॥

हीच सदिच्छा ! मराठीतील नवोदित आणि प्रगल्भ कवींच्या लेखणीतून सतत दर्जेदार, रससमृद्ध आणि समाजाला प्रेरणा देणारे साहित्य निर्माण होत राहो.

## कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे

© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495





### आतुरता कृष्णजन्माची.....

पुढे.....

याचे उत्तर-ज्याच्या प्रकाशात 'सर्व काही आहे' असे जाणवते, तो आत्मा स्वतः नष्ट होत नाही.

११. कालसुद्धा भगवंताच्या अधीन आहे

योऽयं कालस्तस्य तेऽव्यक्तबन्धो
चेष्टामाहुश्चेष्टते येन विश्वम् ।
निमेषादिर्वत्सरान्तो महीयांस्तं
त्वेशानं क्षेमधाम प्रपद्ये ॥ २६ ॥

जो काल विश्वाच्या सर्व हालचालींना प्रवृत्त करतो, क्षणापासून वर्षापर्यंत ज्याची गणना होते, तो कालसुद्धा आपल्या अधीन आहे. अशा त्या ईश्वराला, सर्व कल्याणाचे धाम असलेल्या प्रभूला मी शरण जातो.

आपण म्हणतो-"काळ सगळ्यांना खातो." पण भागवत म्हणते-काळालाही ज्याच्यावर सत्ता नाही, तो श्रीकृष्ण.

काल-बालकाला वृद्ध करतो.साम्राज्ये नष्ट करतो. पर्वत झिजवतो. सृष्टीचे चक्र फिरवतो. पण-कालाचा नियंता परमात्मा आहे.म्हणून भगवंताच्या चरणी शरण जाणे म्हणजे फक्त संकटातून सुटका मागणे नव्हे; कालाच्या भयावर मात करणाऱ्या तत्त्वाशी एकरूप होणे.

१२. मृत्यूला घाबरणाऱ्या जीवाला अंतिम अभय

मर्त्यो मृत्युव्यालभीतः पलायन्
लोकान् सर्वान् निर्भयं नाध्यगच्छत् ।
त्वत्पादाब्जं प्राप्य यदृच्छयाद्य
स्वस्थः शेते मृत्युरस्मादपैति ॥ २७ ॥

मृत्यू नावाच्या भयंकर सर्पाला घाबरलेला मनुष्य सर्वत्र पळत राहतो; परंतु त्याला कुठेही खरे निर्भय स्थान मिळत नाही. पण आज आपल्या चरणकमलांचा आश्रय मिळाल्यावर तो शांत होऊन विसावतो आणि मृत्यूसुद्धा त्याच्यापासून दूर पळतो. हा केवळ मृत्यूबद्दलचा श्लोक नाही. तो संपूर्ण मानवी जीवनाचे चित्र आहे. माणूस कुठे कुठे सुरक्षितता शोधतो? धनात. नात्यांत. सत्तेत. प्रतिष्ठेत. ज्ञानात. शरीरात. घरात. संपत्तीत. पण मृत्यू आला की यापैकी एकही गोष्ट अंतिम आश्रय देऊ शकत नाही. (क्रमश:)



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'आत्या' : माहेरच्या मायेचा एक हळवा कोपरा

पुढे.....

आत्याला हिंदीत 'बुआ' म्हणतात. अनेक हिंदी चित्रपटांतून, मालिकांतून आणि कथांमधून हे नातं आपल्याला डोकावताना दिसतं. पण भाषा बदलली की नातं बदलत नाही. 'आत्या' म्हटलं की जशी आपल्या मनात मायेची एक ओळखीची प्रतिमा उभी राहते, तशीच 'बुआ' म्हटलं की हिंदी भाषिकांच्या मनातही! शब्द वेगळे, उच्चार वेगळे; पण नात्याची ऊब मात्र तीच! 'बुआ' या शब्दातही एक वेगळीच गोडी आहे. हिंदी घरात कदाचित "बुआ के घर चलो!" असं म्हटलं की बालपणाला आनंदाची चाहूल लागते, आणि मराठी घरात "आत्याकडे चल!" म्हटलं की बालपणाला पंख फुटतात! पण दोन्हीकडे स्वागत करणारा मायेचा हात मात्र अगदी सारखाच असतो. कारण नाती भाषेच्या सीमा मानत नाहीत-'आत्या' असो की 'बुआ'!

आजच्या डिजिटल युगात नाती एका क्लिकवर जोडली जातात आणि एका क्लिकवर दूरही जातात. व्हिडिओ कॉलवर चेहरे दिसतात, संदेशांमध्ये शुभेच्छा येतात. पण आत्याने हातावर ठेवलेला उबदार हात, डोक्यावरून फिरवलेली मायेची थाप आणि "काळजी घे रे!" म्हणताना तिच्या आवाजात उतरलेली खरीखुरी काळजी... याला जगात कोणत्याही डिजिटल तंत्रज्ञानाचा पर्याय नाही. (क्रमश:)

# प्रा.यास्मिन शेख - मूर्तिमंत मराठी भाषेवर प्रेम असलेल्या बुद्धीजीवी

**ज्योतिर्मय साहित्य**

आपल्या ओघवत्या वाणीने उपस्थितांचे काळजावर ठसा उमटविणारे ज्ञानवंत प्रा. मिलींद जोशी यांच्या हस्ते अंतर्नाद मासिकामुळे सर्वत्र ओळखल्या जाणाऱ्या, जून २०२५ रोजी वयाची १०० वर्षे पूर्ण करणा-या प्रा. यास्मिन शेख यांचा पुण्यात सत्कार करण्यात आला. हा सत्कार समारंभ प्रथितयश लेखक भानु काळे, लेखक दिलीप फलटणकर, रूमा बावीकर यांनी आयोजित केला होता. प्रा. यास्मिन शेख या मूर्तिमंत मराठी भाषेवर प्रेम असलेल्या बुद्धीजीवी आहेत. मराठी भाषेवरील आणि समाजावरील प्रेम त्यांच्या नसानसात सामावलेले आहे. प्रतिभेच्या पंखावर बसून त्या विचारांच्या आकाशात एकसारख्या भरारी मारत असतात. मराठी भाषा हा आपला सर्वात मोठा सांस्कृतिक वारसा आहे, यावर श्रद्धा असलेल्या प्रा. यास्मिन शेख यांनी मराठी भाषा, साहित्य संस्कृती यांच्यावर आयुष्यभर निरतिशय प्रेम केले आहे. ज्योतीने तेजाची आरती व्हावी अशा या अलौकिक सोहळ्याचा साक्षीदार आपण असणे यापेक्षा दुसरे भाग्य ते काय असावे? हे भाग्य मला लाभले. हा समारंभ खऱ्या अर्थाने ऐतिहासिक असा होता. आपल्या डोळ्यासमोर, एका तपस्वी साहित्यिकाने वयाची शंभरी पूर्ण केली आहे. शंभर वर्षे म्हणजे केवळ आकडा नव्हे, तर तो एक ज्ञानमय अनुभव असून अथांग प्रवासाचा साक्षीदार आहे. जेंव्हा हा प्रवास साहित्याच्या माध्यमातून घडतो तेव्हां तो आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी ठरतो. प्रा. यास्मिन शेख या केवळ शंभर वर्षाच्या झाल्या नाहीत तर, त्यांच्या लेखणीतून उतरलेले प्रत्येक अक्षर तसेच प्राध्यापिका म्हणून विद्यार्थ्यांशी आणि इतरांशी साधलेला संवाद हा विचार आणि अनुभवाचे प्रतिक आहे. त्यांनी समाजाला जीवनाकडे पाहण्याचा एक नवा दृष्टीकोन दिला. आजही त्यांच्या शब्दात तीच ताकद आहे. तीच उर्जा आहे जी तरुणांनाच नव्हे तर सर्वांना मार्गदर्शन करते. त्यांच्या लेखणीला, विचाराला कधीही म्हातारपण आलेले नाही. अनुभवाच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांची लेखणी अधिक समृध्द प्रगल्भ होत गेली. त्या एक विचारवंत, मार्गदर्शक अशा प्रेरणास्रोत आहेत. त्यांच्या विचारातील आणि लेखनातील संवेदनशीलता, समाजाप्रती असलेली तळमळ, मानवी मूल्यांवरील निष्ठा प्रकट करते.

शंभर वर्षाचा प्रवास उलगडताना प्रा. यास्मिन शेख म्हणाल्या.... ''धर्माने ज्यू असूनही घरात मराठी भाषेतील मुबलक पुस्तके होती. त्यामुळे मराठी भाषेतील साहित्य वाचनाची गोडी लागली. महाविद्यालयीन आयुष्यात श्री.म.माटे, के.ना. वाटवे यांच्यासारखे शिक्षक मिळाल्याने मराठी भाषा, व्याकरणाची गोडी वाढतच गेली. मराठीच्या परीक्षेमध्ये प्रथम क्रमांक कधी सोडला नाही. आपली आठवण सांगताना त्या म्हणाल्यासंयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर यशवंतराव चव्हाण यांनी मराठीच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविले. व्याकरणाचे मान्य नियम सोप्या भाषेत समजावून सांगणाऱ्या साहित्याची निर्मिती करावी, अशी सूचना त्यावेळी राज्य मराठी विकास संस्थेच्या अध्यक्ष डॉ. सरोजिनी वैद्य यांनी मला केली. त्यातून मराठी लेखन मार्गदर्शिका हे पुस्तक आकाराला आले आणि ते लोकप्रिय झाले. विशेषतः मला भानु काळे यांनी अंतर्नाद मासिकाच्या निर्मिती प्रक्रियेमध्ये दिलेल्या संधीमुळे माझी ओळख सर्वदूर पोहचली.मी नऊ वर्षाची असताना आईचे निधन झाले. वडिलांनी दुसरे लग्न न करता आम्हा सात भावंडांचा सांभाळ



केला. आई-वडिलांमुळे मला वाचनाची गोडी लागली. माझी ही गोडी वडिलांनी वाढवली तसेच आयुष्याच्या प्रत्येक क्षणी मला वडिलांनी आधार दिला. आदर्श पिता म्हणजे काय याचा अनुभव घेतला असल्याने आपल्या आयुष्यातील वडिलांचे स्थान खूप मोठे आहे'' असेही त्या म्हणाल्या.

प्रा. मिलींद जोशी आपल्या मनोगतात म्हणाले.... ''प्रा.यास्मिन शेख या शतकपूर्ती केलेल्या मराठीचे वैभव आहेत.मराठीवर प्रेम करणारी साहित्य पंढरीची वारकरी मंडळी या समारंभास उपस्थित आहेत. मराठी व्याकरण कवितेसारखे ललितरम्य पध्दतीने समजाऊन सांगता येते याचा आदर्श वस्तुपाठ प्रा. यास्मिन शेख यांनी निर्माण केला आहे. भाषाभान समाजाला देण्याचे महत्वपूर्ण काम त्यांनी केले आहे. तेजस्विता, तपस्विता आणि तत्परता या तिन्हीचा संगम म्हणजे प्रा. यास्मिन शेख. लोकमान्य टिळक देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात, समाजकारणात तसेच केसरी, मराठा या वृत्तपत्रांचे नियोजन करण्यात व्यग्र असतानाही त्यांनी त्याकाळात गोडबोले, साने यांनी मराठी लेखनपद्धती हे या

शिरीष चिटणीस
सातारा ७५८८८६५०५१



लिहिलेल्या पुस्तकावर अग्रलेख लिहिला. तो काळही इतका वेगळा होता कि, या पुस्तकावर अग्रलेख लिहिण्याइतका मराठीसाठी, उत्कर्षाचा काळ होता अस म्हंटल पाहिजे. त्या अग्रलेखात ते म्हणतात... तुमचे आमच्यावरती राज्य आले म्हणून काय झाले ? आमच्या काना, मात्रा, वेलांटीवर तुम्ही राज्य करू शकत नाही. वैय्याकरणी भाषेचे शास्ते खरे, परंतु त्यांचा आधिकारही मर्यादीत आहे. कोणतीही भाषा बोलणारे लोक हेच त्या भाषेचे खरे अधिकारी असतात. असे असले तरी, व्याकरण शास्त्र किंवा व्युत्पत्ती शास्त्र तुम्हाला झुगारून देता येणार नाही. मराठी भाषेच्या उत्कर्षाची आस बाळगून आणि व्याकरणाचा ध्यास घेऊन प्रा. यास्मिन शेख यांनी जे काम केले आहे ते पुढच्या अनेक पिढ्यांना उपयुक्त ठरणार आहे.''

सात्विक समृद्धी आणि संपन्न आयुष्याचे वरदान लाभलेल्या आणि त्यात स्वकर्तुत्वाने मानवी जीवन सुंदर करणाऱ्या अशा असामान्यांची संख्या फार कमी असते. मराठी भाषा व्याकरणतज्ज्ञ प्रा. यास्मिन शेख अशा अतिनिवडक असामान्यांच्या श्रेयनामावलीतील एक सदा प्रसन्न चेहरा. ज्यू कुटुंबात जन्माला आलेल्या आणि वडिलांच्या शासकीय नोकरीमुळे महाराष्ट्राच्या विविध भागांत वास्तव्य केलेल्या प्रा. यास्मिन शेख यांचे आयुष्य अनेकांगांनी विस्मयकारक आहे.

पूर्वाश्रमीच्या जेरुशा जॉन रूबेन या मराठीच्या प्राध्यापिका, भाषाशास्त्र आणि मराठी व्याकरण तज्ञ. १९५० साली प्रा. वसंत कानेटकर यांच्या पुढाकारानं डॅडी शेख यांच्याशी त्यांचा परिचय व लग्न झाले आणि त्या यास्मिन अझीझ अहमद शेख झाल्या. त्यांच्या वडिलांचा प्रा. यास्मिन शेख यांनी मुस्लीम मुलाशी विवाह करण्यास विरोध होता. पण लग्न झाल्यानंतर एक महिन्याने वडिलांच्या घरी जाऊन त्यांना प्रा. यास्मिन शेख यांनी कडकडून मिठी मारल्यावर त्यांचा त्यांच्यावरील राग गेला. वडिलांनी प्रा.यास्मिन शेख यांच्या दोन्ही मुलींचे प्रचंड लाड केले. डॅडी शेख आणि त्यांचे कुटुंब प्रागतिक विचारांचं होतं. डॅडी शेख यांच्या वडिल भगिनी झुबेदाबाई या ग्रँट मेडिकल कॉलेजच्या पहिल्या मुस्लिम महिला विद्यार्थिनी. लहानपणापासूनच शेख यांना डॅडी या नावानं संबोधले जाई. प्रा. यास्मिन शेख आणि डॅडी शेख यांचं सहजीवन हे अत्यंत प्रगल्भ, सुसंस्कृत, प्रागतिक पुरोगामी विचारांनी भरलेलं होतं. त्यांची मोठी मुलगी डॉ.शमा या रूबी हॉल रुग्णालयात ॲनेस्थेटिस्ट होत्या त्या आता निवृत झाल्या आहेत, तर तिचे यजमान अभय भागवत नामांकित चार्टर्ड अकाउंटंट होते,ते आता हयात नाहीत.धाकटी रुकसाना महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेतून उपसंचालक म्हणून निवृत्त झाल्या आहेत. त्यांचे यजमान मध्यपूर्वेत डॉक्टर म्हणून कार्यरत होते,ते निवृत्त असुन आता ते पुण्यातच राहतात.प्रा. यास्मिन शेख यांच्या कुटुंबात ज्यू, मुस्लीम, सिंधी, ब्राम्हण असा सुंदर मिलाफ आहे. स्वतः त्या कुठलाच धर्म, जात मानत नाहीत. जातीधर्माच्या व्देषामुळे माणसं एकमेकांपासून तोडली जातात हा त्यांचा मूल्यात्मक विचार आहे. डॅडी शेख यांच्या मृत्यूनंतरची घटना भानू काळे आणि दिलीप फलटणकर यांनी संपादित केलेल्या 'यास्मिन शेख मूर्तिमंत मराठीप्रेम' या ग्रंथात त्यांनी सांगितली आहे. त्या म्हणाल्या, ''मुत्यूनंतर आपले दफन न करता दहन करावं अशी डॅडी शेख यांची इच्छा होती. ती त्यांनी तोंडी सांगून ठेवली होती. परंतु वैकुंठात गेलो, तर आडनाव ऐकल्यावर ते नाही म्हणाले. लोक आंदोलन करतील म्हणाले. माझ्या मुलीन ते लावूनच धरलं. शेवटी त्यांना दहन करावं लागलं. शाहीर अमर शेख, हमीद दलवाई यांचेही दहन केलेलं आहे.'' प्रा. यास्मिन शेख यांचं शालेय शिक्षण पंढरपूर इथं, तर महाविद्यालयीन शिक्षण पुण्याच्या स.प. महाविद्यालयातून झालं. मराठी भाषा व साहित्य हा त्यांचा अभ्यासाचा मुख्य विषय. बी.ए.बी.टी. त्या प्रथम वर्गात उत्तीर्ण झाल्या. एम.ए.ची पदवी मिळाल्यावर त्यांनी औरंगाबाद इथं महाविद्यालयात दोन वर्षे अध्यापन केलं. नंतर तब्बल पंचवीस वर्षे त्यांनी मुंबईला शीव इथं एस.आय. इ. एस. महाविद्यालयात मराठीचं अध्यापन केलं. त्यावेळी श्री.पु. भागवत तिथं विभागप्रमुख होते, तर विंदा करंदीकर इंग्रजी शिकवीत होते. निवृतीपूर्वी सहा वर्षे त्या मराठी विभागप्रमुख होत्या. निवृत्तीनंतर दहा वर्षे आय.ए.एस. च्या विद्यार्थ्यांना त्यांनी व्याकरण, भाषाशास्त्र शिकवले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्टीटरवर... ज्येष्ठ लेखिका आणि व्याकरणतज्ञ प्रा. यास्मिन शेख यांनी आज वयाची शंभरी गाठली. मी त्यांना वाढदिवसाच्या अतिशय मनः पूर्वक शुभेच्छा देतो! मराठी आणि भाषेतील व्याकरण यासाठी त्यांनी यापुढेही समाजाला मार्गदर्शन करीत राहावे आणि ईश्वराने त्यांना दीर्घ आणि निरोगी आयुष्य प्रदान करावे, अशा शुभकामना व्यक्त केल्या. सत्कार समारंभाच्या सुरवातीला डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर यांचा संदेश वाचून दाखविण्यात आला. त्यात ते म्हणतात... महात्मा गांधी म्हणाले होते मानवी आयुष्य १२५ वर्षांचे असते आणि मी १२५ वर्षे जगणार आहे. त्यांची हत्या झाली नसती तर त्यांचे हे स्वप्न पूर्ण झाले असते. आपल्या सर्वांच्या मार्गदर्शक पाणीनीचा वसा जपणाऱ्या, जोपासणाऱ्या आणि महाराष्ट्राला समजावून देणाऱ्या प्रा. यास्मिन शेख शतक पूर्ण करून १०१ व्या वर्षात प्रवेश करत आहेत. त्या महात्मा गांधीजींना मानतात, सर्वधर्मसमभाव मानतात आणि गांधीजींचे हे स्वप्न पूर्ण करणार म्हणून त्यांनी आज पुढील दमदार वाटचाल सुरू केली आहे. त्यांना खूप खूप शुभेच्छा !

# प्रतिज्ञा

**ज्योतिर्मय साहित्य**

मोठेपणा भव्यता खंबीरपणा, छाया ह्या मोठ्या झाडांच्या माध्यमातून आपण नेहमी अनुभवत असतो. त्याच्या ह्या गुणांचा अभ्यास केला तर आपल्या चंचल विचारांना वेगळेपण येवून सकारात्मकता येवू शकते. आपल्या संकल्पांना चालना मिळू शकते. पण ते सद्गुण आत्मसात करण्यासाठी आपल्या मनाची दृढता, प्रयत्न करण्याची शक्ती, संयमावर मनाचा विश्वास सोबत असावा लागतो. अंतःकरणातून ओढ असेल तर कार्य पुर्ण होते). कारण निश्चयाचे बळ तुका म्हणे तेथे उत्तम फळ.



अतःकरणातून उफाळून वर आलेला दृढनिश्चय म्हणजे प्रतिज्ञा होय. एकदा प्रतिज्ञा घेतली की त्यापासून मन कोठल्याही प्रलोभनाला बळी न पडता त्याच्या पूर्ततेकडे धावत असते. निर्धाराचे बळ त्यात असते. हे दृढ निश्चयाचे बळ अनादिकालापासून चालत आले आहे.

भिष्मप्रतिज्ञा, जान जायपर वचन न जाय ही रामचंद्रांची प्रतिज्ञा, पितृ आज्ञा पालनासाठी सोसलेला वनवास, जनमताचा आदर म्हणून केलेला सीता त्याग, दुराचारी नंद राजाला पदच्यूत करण्याची आर्य चाणक्याची प्रतिज्ञा, त्याचप्रमाणे स्वराज्यासाठी रायरेश्वराच्या मंदिरात घेतलेली शिव प्रतिज्ञा, आधी लगीन कोंढाण्याच म्हणणारे तानाजीने पूर्णत्वाकडे नेण्याची प्रतिज्ञापूर्ती गनिमाला खिंडीत गाठून लढतो तुम्ही गड गाठा ही बाजीप्रभूची प्रतिज्ञापूर्ती. क्रांतीकार्यात झोकून दिलेल्या भगतसिंगाची प्रतिज्ञा, मेरी झाँसी नही दुंगी, ही शूर रणरागिणी मर्दानी लक्ष्मीबाईची प्रतिज्ञा. स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे. तो मी मिळवीणारच ह्या लोकमान्य टिळकांची प्रतिज्ञा, दास्यत्वातून मुक्त करण्याची महात्मा गांधींची प्रतिज्ञा, उस्ताद लहूजी साळवेची प्रतिज्ञा, सावरकरांची प्रतिज्ञा असे कितीतरी उदाहरणे अध्यात्मिक ग्रंथातून आणि इतिहासाच्या पानामधून आपल्या समोर आहेत. त्यांची मते एखाद्या स्थितप्रज्ञा सारखी उभी आहेत. झाडे, निसर्ग त्याची साक्षीदार आहेत. अशाप्रकारे थोर पुरुषांच्या थोरपणाचे सामर्थ्य त्यांच्या दृढनिश्चयात प्रतिज्ञेत सामावलेले आपण पहात आलो आहोत. ह्या प्रतिज्ञा आपल्याला जिवनउत्कर्ष साधन्यासाठी मार्गदर्शक ठरतात. महाभारतात अनेक प्रतिज्ञा अनेकांनी केलेल्या असून पुर्णत्वाकडे नेलेल्या आपण पाहतो. द्रौपदीची प्रतिज्ञा, अर्जुनाची ब्रहद्रथाला मारण्याची प्रतिज्ञा, आपल्याला सत्यासाठी सदैव उर्जा देत असतात. विवेकानंदांची धर्मप्रचाराची प्रतिज्ञा, गांधींजीची मिठाची प्रतिज्ञा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची महाड चवदार तळ्याची प्रतिज्ञा, महात्मा ज्योतिबा फुले समाज उत्कर्षाची प्रतिज्ञा, सावित्रीबाई फुले यांची स्त्रीशिक्षणाची प्राधान्य देण्याची प्रतिज्ञा आपण आजही उराशी बांधून त्याच्या पुर्ततेसाठी त्यांनी प्रयत्न करुन झालेले लाभ आपण आज आनंदाने चाखतो आहोत आणि उराशी प्रतिज्ञेचे महत्व जाणून घेतो. व तशा प्रतिज्ञा करण्याचा प्रयत्न करतो. आपण सर्वसाधारण व्यक्ती दर पाडव्याला, दसऱ्याला, जानेवारी च्या प्रथम दिनी प्रतिज्ञा करतो. मग अमुक करीन, तमुक करीन पण हे वादळ काही दिवसातच सातत्य न टिकविल्याने शांत होते. कारण त्या प्रतिज्ञाशी आपण फक्त संकल्पाने जोडले जातो. पण कृतीत उतरतच नाही त्या फुसक्या ठरतात. एक पेड मॉ के नाम ही प्रतिज्ञा सार्वांनाच मनोमन आनंद देते पण आपण एकदातरी पूर्णत्वास नेतो काय? हा प्रश्न आपल्याच मनाला विचारा. दरवर्षी अनेक शासकीय कार्यालयाच्या प्रांगणामध्ये वृक्षारोपणाचे समारंभ मोठ्या धुकधडाक्यात केला जातो पण त्यापैकी शून्य टक्के झाडे जीवंत असतात. कारण पुन्हा त्याकडे कोणी लक्ष देत नसतो. किंवा पुढच्या वृक्षारोपणासाठी त्याच खड्ड्याचा उपयोग केला जातो. अशा या प्रतिज्ञा करण्यात काय अर्थ आहे त्या फसव्या ठरु नये. म्हणून प्रयत्न करणे आज काळाची गरज आहे. अर्थात याला काही अपवाद असू शकतात. अशा ह्या वेगळी प्रतिज्ञा करण्यात काय अर्थ त्या फसवू ठरु नये. म्हणून प्रयत्न करणे काळाची गरज आहे. होय नाही.

आर. पी. दुसे
छ. संभाजी नगर 9422202747



# सण, उत्सवांचे पावित्र्य जपा

**ज्योतिर्मय साहित्य**

आपल्या संस्कृतीमध्ये सण आणि उत्सवांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. उत्सव हा मानवी जीवनातील मरगळ झटकून, मनाला चैतन्य देणारा आणि समाज मनाला एकत्र जोडणारा असा एक महत्त्वाचा दुवा आहे. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव आणि नवरात्रातील शक्तीची उपासना असणारा दुर्गोत्सव, हे दोन्ही सण महाराष्ट्रासह संपूर्ण भारताच्या सांस्कृतिक अस्मितेचे मुख्य स्तंभ आहेत. या उत्सवांचा मूळ उद्देश राष्ट्रजागृती, सामाजिक ऐक्य, कलागुणांना वाव आणि लोकप्रबोधन हाच होता,आणि आताही असायला हवा. परंतु, काळाच्या ओघात या पवित्र उत्सवांना व्यावसायिकता, स्पर्धा आणि पाश्चात्त्य विकृतीचे गालबोट लागले आहे. आज उत्सवांमध्ये घुमणारा डी.जे.चा कानठळ्या बसवणारा आवाज, अश्लील व बीभत्स गाणी आणि त्यावर होणारा अंगाचा थरकाप उडवणारा नाच यामुळे उत्सवाची




सात्त्विकता धोक्यात आली आहे. ही परिस्थिती बदलून उत्सवांना पुन्हा एकदा त्यांचे मूळ, विधायक आणि कल्याणकारी स्वरूप देणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे.

गेल्या काही वर्षांत गणेशोत्सव आणि दुर्गोत्सवातील विसर्जन मिरवणुकींचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. पारंपारिक ढोल-ताशा पथके, लेझीम, आणि भजनांची जागा आता कर्कश्य आवाजाच्या डीजे सिस्टीमने घेतली आहे. सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेल्या ध्वनी मर्यादांची सर्रास पायमल्ली होताना दिसते. या डीजेवर वाजवली जाणारी गाणी कोणती असतात? तर चित्रपटगृहातही लाजवणारी, द्विअर्थी, आणि पूर्णपणे बीभत्स शब्द असणारी आयटम साँग्स. धार्मिक उत्सवांमध्ये अशा गाण्यांच्या तालावर तरुणाई ज्या प्रकारे अश्लील अंगविक्षेप करत नाचते, ते पाहून हे धार्मिक उत्सव आहेत की एखाद्या पबमधील गोधळ, असा प्रश्न पडतो. सध्याचे हे अनेक ठिकाणी दिसणारे विदारक चित्र बदलायला हवे.

या आवाजाच्या प्रदूषणाचे गंभीर शारीरिक आणि मानसिक परिणाम समाजावर होत आहेत. मिरवणुकीतील अतिउच्च डेसिबलच्या आवाजामुळे वृद्ध नागरिक, लहान मुले, गरोदर महिला आणि आजारी व्यक्तींना त्रास असह्य होतो. दरवर्षी उत्सवाच्या काळात हृदयविकाराचा झटका येऊन रुग्णालयात दाखल होणाऱ्या किंवा मृत्यूमुखी पडणाऱ्या नागरिकांच्या बातम्या आपण वाचतो. प्राण्यांना आणि पक्षांनाही या आवाजाचा प्रचंड त्रास होतो. केवळ वैयक्तिक आणि तात्पुरत्या आनंदासाठी समाजातील एका मोठ्या घटकाच्या आरोग्याशी खेळणे, ही अत्यंत खेदजनक बाब आहे.

**(क्रमशः)**

विशेष...


दिलीप देशपांडे.
जामनेर. जिल्हा जळगाव.
८९९९५६६९१७
dilipdeshpande24@gmail.com



# हॅलो, मी बाबा बोलतोय ! कशी आहेस बाळा?

**ज्योतिर्मय साहित्य**

मध्य रात्री झोपेत अशोक काका ''शैलजा बाळा निट राहा, सांभाळून राहा''. अशी सारखी बडबड करू लागले. आणि अचानक उठून बसले. आत्ता फोन करावा तर लेक घाबरेल म्हणून कधी एकदा सकाळ होते आणि कधी एकदा लेकिशी बोलतो असं झालं होतं काकांना. खोलीत रात्रभर इकडून तिकडे फेऱ्या मारण्यात काकांची अक्खी रात्र गेली. सकाळ झाली. सकाळी सातच्या दरम्यान काकांनी लेक शैलजाला फोन केला. थरथरत्या आणि खुप घाबरलेल्या आवाजात लेकीला म्हणाले, ''हॅलो, शैलू कशी आहेस बाळा?. अगं तु फार दुःखी आहेस, खुप चिंतीत आहेस असं वाईट स्वप्नं पडलं. शैलू खरं सांग बाळा बरी आहेस ना तु. कांही टेन्शन वगैरे नाही ना.



आणि हो तसं कांही असेल तर मला सांग. जावईबापू आधीसारखी अजून मारहाण तर करत नाहीत ना तुला. हे बघ बाळा. अगं संसार म्हटला कि कुरबुर ही होतेच.

पण जर अपेक्षापेक्षा जास्त वाद होत असतील तर आजकाल आईवडिलांना मुलींच्या बाबतीत योग्य काय तो निर्णय घ्यावा लागतो आहे. कारण, संसार आहे. होत असतात वाद असं म्हणून जर आम्ही आईवडिलांनी जर कानाडोळा केला तर आम्ही आमच्या फुलासारख्या लेकीबाळींना गमावत आहोत. याचं भान आम्ही आईवडिलांनी ठेवलंच पाहिजे. शैलू बाळा तुला तूझ्या सासरी मारहाण होत असेल, तूझ्या चारित्र्यावर शंकेचे गलिच्छ शिंतोडे उडवले जात असतील तर या गोष्टी माझ्यापासून लपवून ठेऊ नकोस. मनमोकळेपणाने सगळं कांही माझ्याशी बोल बाळा. अगं आम्ही तुझे आईवडील आहोत. तुझी चिंता आम्ही नाही करणार तर अजून कोण करणार?.

शैलू बाळा, अगं सासर घरी तुम्हा मुलींना खुप त्रास असतो पण तुम्ही मुली ''उगाच आईवडिलांना टेन्शन नको''. असं म्हणून तुम्ही मुकपणे सगळं कांही सहन करीत असता. पण आजघडीला हे चुकिचं आहे बाळा. तुम्हाला सासरघरी जो त्रास होतो वा दिला जातो तो आईवडिलांना सांगा. सासरघरचा जीवघेणा त्रास, जाच मुकाट्याने सहन करुन करुन आज कित्येक मुली जीवानीशी गेल्या.

**(क्रमशः)**

सौ. मनीषा सोन्नेकर/सोनकांबळे
देगलूर. 9960028899



हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559